**नियमित दिवाणी दावा क्र.७०८/२०२० मधील**

**निशाणी ११४ खालील आदेश**

*(CNR No.MHSN150061592020)*

प्रतिवादी क्र.१अ ते १ड यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होणेकरिता दाखल केलेला आहे.

(२) सदरचा दावा वादीने या प्रतिवादींविरुध्द ठरावाबाबत, तुर्तातुर्त व निरंतरचे ताकि दीबाबत दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१अ ते १ड यांचेकडून कैफियत देणेस विलंब झाला आहे. त्यामुळे, त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश पारित झालेला आहे. त्याकामी त्यांनी मुद्दामपणे विलंब केलेला नाही. तरी प्रतिवादी क्र.१अ ते १ड यांचेविरुध्द झालेला एकतर्फा हुकुम रद्द व्हावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

(३) वादींतर्फे विधीज्ञांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे सादर करुन प्रतिवादी क्र.१अ ते १ड यांचे वरील मागणीबाबत आक्षेप घेऊन सदर अर्ज रद्द करणेची विनंती केली आहे.

(४) निशाणी ११४ वरील अर्ज, त्यापुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र व निशाणी ११४ चे अर्जावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र.१अ ते १ड यांना दि.१७.०१.२०२२ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. त्यांना दाव्याकामी कैफियत दाखल करणेस विलंब झालेला आहे. तरी सदर प्रतिवादींनी कैफियत दाखल केलेस दाव्याचे कामकाज पुढे चालून दावा गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप विचारात घेता सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

प्रतिवादी क्र.१अ ते १ड यांचा निशाणी ११४ वरील अर्ज मंजूर

करणेत येत आहे.

DEEPALI
SHIVAJI
CHOTHE
Digitally signed by DEEPALI SHIVAJI CHOTHE
Date: 2022.05.10 18:33:16 +05'30'

विटा. (दीपाली शिवाजी चोथे)
दि.०२.०५.२०२२. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | :- S.V. Gaikwad |
| Name of the Court | :- Smt. Deepali S. Chothe, Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- 02.05.2022 |
| Order signed by P.O. on | :- 09.05.2022 |
| Order uploaded on | :- 10.05.2022. |